साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * बुधवार, दि. २६ जून २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## राजर्षी शाहू महाराजांनी दाखविलेल्या मार्गानेच महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल सुरु राहील - अजितदादा पवार

मुंबई, (जि.मा.का.):- सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे जनक, रयतेचे राजे, लोकराजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्णजयंती निमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या कार्याला, विचारांना, स्मृतींना कृतज्ञतापूर्वक वंदन केले आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन, त्यांनी दाखविलेल्या मार्गाने सर्वांना सोबत घेऊन सर्वसमावेशक विकासाच्या वाटेवरची महाराष्ट्राची वाटचाल कायम राहील, असा विश्वास व्यक्त करतानाच उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सर्वांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

उपमुख्यमंत्री श्री. पवार आपल्या संदेशात म्हणतात की, राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचारांवर देशाची दमदार वाटचाल सुरु आहे. 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' या विचारांवरच पुरोगामी महाराष्ट्र देशात आपले वेगळेपण टिकवून आहे, तोच महाराष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी राज्याची संकल्पना, त्यांच्या विचारांचा, कार्याचा कृतिशील वारसा खऱ्या अर्थाने पुढे नेण्याचे काम छत्रपती शाहू महाराजांनी सक्षमपणे केले. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य प्रत्येक राज्यकर्त्यासाठी, सरकारसाठी मार्गदर्शक आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज खऱ्या अर्थाने लोकोत्तर राजे होते. लोकांनी त्यांच्या कामासाठी सरकारच्या दारात येण्याची गरज नाही, सरकारचं लोकांच्या दारात जाईल, हा विचार शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात अंमलात आणला. त्याच विचारांवर राज्य शासन काम करत आहे. त्यामुळे 'शासन आपल्या दारी'सारख्या लोककल्याणकारी अभियानाची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे सुरु आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने यापुढेही महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल सुरु राहील, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शाहू महाराजांच्या कार्याचे, विचारांचे स्मरण करुन त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले आहे. ***

## 'राजस्थानी'च्या ठेवीदारांचे परळीत ठाण्यासमोर उपोषण सुरु

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी वैजनाथ येथील राजस्थानी मल्टीस्टेट को.ऑप क्रेडिट सोसायटीचे चेअरमन व संचालकांना अटक करुन ठेवी परत कराव्यात या मागणीसाठी सोमवार (दि.२४) पासून ठेवीदारांनी येथील पोलिस ठाण्यापुढे बेमुदत उपोषण सुरू केले आह.

परळी येथील गुणाबाई सायसराव मुंडे, सुवर्णमाला अच्युतराव फड, भागवत मुळे यांच्यासह इतर ठेवीदारांनी बेमुदत उपोषणास सुरूवात केली आहे. त्यांच्या उपोषणास सुमारे दीडशे ठेवीदारांनी पाठींबा दिला आहे.

राजस्थानी मल्टीस्टेट परळीचे चेअरमन व संचालकांना अटक करावी, ठेवीदारांच्या व्यतिरिक्त विक्री झालेल्या राजस्थानी मल्टीस्टेटच्या व संचालकांच्या स्थावर मालमत्तेची सखोल चौकशी करावी, ठेवीदारांच्या कष्टाने कमावलेल्या ठेवी परत मिळाव्यात, राजस्थानी मल्टीस्टेटच्या मालकीतील व चेअरमन तसेच संचालक मंडळाच्या स्थावर मालमत्तेची खरेदी-विक्री व्यवहार होवू नये, राजस्थानी मल्टीस्टेटच्या कर्जदारांची अधिकृत यादी जाहीर करावी या मागण्यासाठी ठेवीदार पोलिस ठाण्यापुढे उपोषणास बसले आहेत. त्यांना इतर ठेवीदारांनी पाठींबा दिला आहे.

राजस्थानी मल्टीस्टेटच्या परळीतील पाच शाखा सात महिन्यांपासून बंद असून याचे संस्थेचे चेअरमन व सर्व संचालक फरार आहेत. त्यामुळे गरीब, निवृत्त, ज्येष्ठ नागरिक, छोटे व्यावसायिक ठेवीदार हे मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेकांचे मानसिक संतुलनही ढळत चालले आहे, आपल्या ठेवी परत मिळाव्यात हे ठेवीदार मोठे प्रयत्न करताना दिसत आहेत. ***

## औरंगाबाद-परळी-हैद्राबाद रेल्वेचा गुंटूर पर्यंत विस्तार

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी रेल्वे स्थानकातून धावणारी औरंगाबाद-परळी-हैद्राबाद या रेल्वे गाडीचा विस्तार करण्यात आला असून आता ही रेल्वे १ जुलै पासून गुंटूर जंक्शन पर्यंत धावणार आहे. अशी माहिती सुत्रांनी दिली. या रेल्वेचे आरक्षण देखील सुरू करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यपूर्व निजामकालीन हैद्राबाद-परळी दरम्यान धावणारी सर्वात पहिले रेल्वे असलेल्या या गाडीस परळी-परभणी दरम्यान ब्रॉडगेज मार्ग बनविल्यानंतर औरंगाबाद पर्यंत विस्तारित करण्यात आले होते. सुरुवातीला



कोळशाच्या इंजिन वर धावणारी ही रेल्वे गाडी आजमितीस विद्युत इंजिन घेवून धावत आहे. कोवीड-१९ या संसर्गजन्य आजारानंतर पूर्वीची ही पॅसेंजर रेल्वे गाडी एक्सप्रेस म्हणून धावत आहे. सर्वाधिक उत्पन्न आणि प्रवाशांची गर्दी याच रेल्वे गाडीला आहे. औरंगाबाद आणि हैद्राबाद या दोन्ही रेल्वे स्थानकावर पोहचल्यावर ही रेल्वे गाडी अनेक तास रेल्वे स्थानकात उभी असते तर याच वेळेत हैद्राबाद येथून गुंटूर पर्यंत धावणारी एक्सप्रेस प्रस्थान करते. याच परिस्थितीचे अवलोकन करुन दक्षिण मध्य रेल्वे कडून औरंगाबाद-हैद्राबाद रेल्वे गाडीला विस्तारित करण्यात आले आहे.

विस्तारीकरण नंतर गाडी क्रमांक १७२५३ गुंटूर जंक्शन ते औरंगाबाद तर गाडी क्रमांक १७२५४ औरंगाबाद ते गुंटूर जंक्शन अशी धावणार आहे. या रेल्वे गाडीच्या विस्ताराने प्रवाशांना आंध्र प्रदेशातील विजयवाडा पर्यंत जाण्यास मोठी मदत होणार आहे. या विस्तारित रेल्वे गाडीसाठी आरक्षण देखील सुरू करण्यात आले आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांची सोय होणार आहे. ***


## मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी स्वीकारला पदभार



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचे नुतन मुख्य अभियंता म्हणून सुनील इंगळे यांनी पदभार स्वीकारला आहे.

या पदावर असलेले अनिल काठोये यांची मुंबई येथे बदली झाली आहे. तर रिक्त जागेवर उरण येथील सुनिल इंगळे आले आहेत. त्यांनी आपला पदभार स्वीकारला असून वीज केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व इतरांनी त्यांचे स्वागत केले आहे. ***

## दोन दिवसाच्या मुक्कामासाठी संत श्री गजानन महाराजांची पालखी रविवारी परळीत



परळी वैजनाथ (बातमीदार):- विदर्भातील शेगांव संस्थान येथील संत श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे रविवारी (दि.३०) परळीत आगमन होणार असून पालखीचा दोन दिवस परळीत मुक्काम असणार आहेत.

रविवारी (दि.३०) थर्मल वसाहतीतील न्यू हायस्कूल शाळेत तर सोमवारी (दि.१) परळीत संत जगमित्र नागा मंदिरात मुक्कामी राहणार आहे. १३ जूनला शेगांव येथुन पंढरपुरकडे निघालेल्या श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे परळी व पंचक्रोशितील भक्तभावीक मोठ्या आतुरतेने वाट पाहत असतात. उर्जानगर वसाहतीतील मुक्कामानंतर ही पालखी शहरातील अग्रवाल लॉज, मोंढा मार्केट, राणी लक्ष्मीबाई टॉवर, नेहरू चौक मार्गे जगमित्र नाना मंदिर ह्या मुख्य रस्त्यावरून जात असतांना भाविक मोठ्या श्रद्धेने या श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे भक्तिभावाने दर्शन घेतात. सोमवारी सकाळी ६.३० वाजता उड्डाणपुलावर या पालखीचे स्वागत होणार आहे. ज्या भाविकभक्तांना देणगी द्यावयाची आहे त्यांची देणगी हासानंद बेगराज सामत कापड दुकान व अतुल क्लॉथ येथे स्विकारली जाईल. सर्व कापड व्यापारी व विविध व्यापारी यांच्याकडुन पालखीची सेवा व व्यवस्था केली जाते अशी माहिती विजय हासानंद सामत, विक्रम देशमुख, श्रीकांत गुंडाळे, रंजित भोयटे, रामकिशन देवशटवार यांनी दिली.

श्री गजानन महाराज यांची पालखी दि.१ जुलै रोजी दुपारी १२ वाजल्यापासुन परळीतील जगमित्र नागा मंदिर येथे थांबणार असुन दि.२ जुलै २०२४ रोजी सकाळी कन्हेरवाडी मार्गे अंबेजोगाईकडे मार्गस्थ होणार आहे. या पालखीत सातशे वारकरी सहभागी झाले असून पालखीचे ५४ वे वर्ष आहे. ***

## उन्मेष मातेकर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा



परळी वैजनाथ (बातमीदार):- येथील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या उर्जानगर वसाहतीतील विद्यावर्धिनी विद्यालयात दीर्घकाळ मुख्याध्यापक म्हणून सेवा केलेले उन्मेष हरिहरराव मातेकर हे सेवानिवृत्त झाले असून शाळेच्या वतीने बुधवारी (दि.२६) त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा आयोजित केला आहे. सकाळी दहा वाजता शाळेच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, माजी प्राचार्य राजाराम धाट यांच्यासह शरदराव हेबाळकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच विद्यावर्धिनी विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी केले आहे.*

सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना

बीड, (जि.मा.का.):- बीड जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शासकीय शासन अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतन मध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, जाती व भटक्या जाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये. स्वराज ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने वेळापत्रक जाहीर केलेले आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षापूर्वी घेतलेली १५० विद्यार्थ्यांना, तृतीया वर्षात बीड जिल्ह्यातील १५० विद्यार्थ्यांना व व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना अशा पध्दतीने बीड जिल्यातील ४५० विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे शासनाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजने करिता पुढील प्रमाणे नमूद वेळापत्रकानुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष उच्च शिक्षणाचे द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष अर्ज स्विकारण्याची तारीख २१ जून २०२४ अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२४ असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, बीड या कार्यालयात ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहाय्यक संचालक यांनी केले आहे. ***

# माझी शाळा, माझा परिवार!

मला आठवतो तो माझ्या नोकरीचा पहिला दिवस.मी मंगळवारी माझ्या श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यावर्धिनी विद्यालयात रुजू झालो.पूर्णपणे नवीन वातावरणात मी रुजू झालो होतो. नवीन संस्था,नवीन संचालक,नवीन सहकारी शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी मी थोडे गोंधळून गेलो होतो. सर्वप्रथम तत्कालीन मा सचिव श्री कोळगे साहेब,श्री भिंगोरे साहेब,श्री पैंजणे साहेब,श्री ईटके,श्री एम टी मुंडे साहेब यांनी सर्वांशी माझा परिचय करून दिला.आज त्या गोष्टीला २७ ते २८ वर्षे झाली,पण आजही ते सर्व प्रसंग स्पष्ट आठवतात.

माझ्या संपूर्ण कार्यकाळात मला आज कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकांचे मनापासुन सहकार्य लाभले. त्यांच्या उस्फुर्त सहकार्यामुळे आजचे विद्यावर्धिनी विद्यालयाचे नाव परळी शहरात व बीड जिल्ह्यात गाजत आहे.मी रुजू झालो तेंव्हा शाळा १ ली ते ७ वी पर्यंत होती.१९९९ ला ८ वी ते १० वी हे माध्यमिकची स्वतंत्र शाळा मान्यता प्राप्त झाली.पहिल्यांदा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. ८ वीचा पहिला वर्ग फक्त ४३ विद्यार्थ्यांचा होता.विरोधक नाही म्हटले तरी होतेच. पण त्यातूनही मार्ग काढत आज आमची शाळा या स्तरापर्यंत पोहोचली आहे.हे मार्गक्रमण चालू असताना आमच्या संस्था सचिव व संस्था संचालकांनी आम्हाला भक्कम मानसिक व आधार दिला. कोणतीही अडचण जी आमच्या आवाक्याबाहेरची असली की संस्थेच्या संचालकांनी ती समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले.

आमच्या शाळेचे ५वी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या संदर्भात नाव होते. मी रुजू होण्या पूर्वीपासून त्यासाठी सर्वांनी खूप परिश्रम घेतले होते.शिष्यवृत्तीचा विद्यावर्धिनी पॅटर्न त्यांच्यामुळे निर्माण झाला. शिष्यवृत्ती निकाल म्हंटल की विद्यावर्धिनी विद्यालयाचे पहिल्या पाचमध्ये हमखास विद्यार्थी असायचे त्यांनी पाया रचला, त्यावर आम्ही कळस बांधण्याचा प्रयत्न केला,आणखी पुढे खूप मोठा पल्ला गाठवयाचा आहे.

माध्यमिकसाठी आम्हाला भरपूर परिश्रम घ्यावे लागले.मला आठवते की लीना भाटकर ही विद्यार्थिनी परळी शहरातून माध्यमिक शालांत परीक्षेत( १० वी बोर्ड ) पहिल्यांदा गुणवत्ता यादीत अली होती.त्यानंतर आम्ही मागे वळून पाहिले नाही.पहिली काही वर्षे आम्हाला विद्यार्थी प्रवेशासाठी परिश्रम घ्यावे लागले.आज विद्यावर्धिनी विद्यालयाचे विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत असून तेथे आपले कर्तृत्व दाखवून दिले आहे. वैद्यकीय क्षेत्र, अभियांत्रिकी क्षेत्र, संशोधन क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, बँकिंग क्षेत्र,सॉफ्टवेअर क्षेत्र,व्हेटर्नरी क्षेत्र, कृषी क्षेत्र,खाजगी व्यवसाय क्षेत्र, व शिक्षण क्षेत्र या सर्वच क्षेत्रात त्यांनी आपले कर्तृत्व दाखवून दिले आहे. काही विद्यार्थी परदेशात मोठ्या पदांवर काम करत आहेत,त्यांचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.काही माजी विद्यार्थी शाळेसाठी चांगल्या प्रकारे योगदान देत आहेत.काही माजी विद्यार्थी हे शाळेतील गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तक,शालेय गणवेश न चुकता देऊनआपले सामाजिक दायित्व पार पाडत आहेत. आम्ही शालेय वयात दिलेले संस्कार त्यांच्या जीवनात कामाला आले. प्रशासनात काम करत असताना फ्रि हॅन्ड दिला त्यामुळे काम करताना उत्साह आला.संस्थेत व शाळेत काम करताना विविध प्रकारचे अनुभव मिळाले.मी अनुभव समृद्ध झालो. कोणाशी कसा संवाद करावा हे शिकायला मिळाले. शक्यतो कोणताही पालक शाळेत काम घेऊन आल्यानंतर तो समाधानानेच परत कसा जाईल असा प्रयत्न मी केला. संस्थेने जे काही प्रकल्प राबवले त्याचे प्रकल्प अहवाल तयार करावे याचा अनुभव मिळाला. प्रकल्प सादरीकरण कसे करावे याचेही ज्ञान प्राप्त झाले व हळूहळू नाही म्हटले तरी सभाधीटपणा (स्टेजकरेज) आला.

शाळेत मी शेवटच्या दिवसापर्यंत अध्यापन केले. इयत्ता १० ला इंग्रजी विषयाचे अध्यापन केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व अध्यापन करणे यात एक मानसिक समाधान लाभले.मी जरी मुख्याध्यापक म्हणून काम केले असले तरी मी प्रथम अध्यापक होतो. ती जबाबदारी मी पार पाडली.मुख्याध्यापक म्हणून काम करत असताना विद्यार्थी, पालक, शिक्षण विभाग, शिक्षक, इतर शाळांचे मुख्याध्यापक या सर्वांबरोबर सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शाळेची प्रगती झाली आहे. आमची शाळा शिस्त व संस्कार यासाठी प्रसिद्ध आहे. यासाठी मला माझ्या सर्व शिक्षक बंधू व भगिनीं व सर्व आदरणीय संचालक यांनी मनापासून सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे खूप खूप धन्यवाद. शाळा प्रगतीपथावर नेणे हे एकट्याचे काम नाही ते एक सामूहिक काम आहे.

माझी शाळा माझा एक परिवार आहे. गेल्या २७ वर्षात मला त्याची वारंवार प्रचिती आली.२०१६ मध्ये मुख्याध्यापक बैठक आटोपून माजलगावहून परत येताना माझा मोठा अपघात झाला होता. त्यावेळी माझ्या विद्यावर्धिनी परिवाराने मला भक्कम मानसिक आधार दिला.

मी साडेपाच महिने पुण्यातील संचेती हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले.पायात रॉड टाकण्यासहित पाच शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्यावेळी श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व विद्यावर्धिनी विद्यालय परिवाराने वारंवार पुण्याला येऊन भेटून मानसिक बळ दिले.त्या आधारावर मी पूर्णपणे बरा होऊन परत आलो. हे केवळ आमच्या या सर्वांच्या स्नेहामुळे शक्य झाले. हे माझ्यापुरतं मर्यादित नाही तर संस्थेतील व शाळेतील सर्वांना याचा अनुभव आहे.अशी आहे माझी शाळा आणि माझा परिवार.

**– उन्मेष मातेकर**

सेवानिवृत्त मुख्याध्यापक,
विद्यावर्धिनी विद्यालय, परळी वै.

# न्यू हायस्कूल शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील न्यू हायस्कूल व नवीन प्राथमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी जमली होती. विद्यार्थी, शिक्षकांचा मोठा प्रतिसाद या योग दिनाला मिळाला.

योग प्रशिक्षक श्री सुरेंद्र शास्त्री यांनी या कार्यक्रमाचे नेतृत्व केले. श्री. शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि योग्य पद्धतीने योग कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. श्री शास्त्री यांनी विविध योगासने करून दाखवली, ज्यामध्ये ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन, वज्रासन आणि भद्रासन यांचा समावेश होता. प्रत्येक आसनाची माहिती देऊन त्याचे फायदे आणि ते करण्याची योग्य तंत्र विद्यार्थ्यांना शिकवली. त्यांनी विद्यार्थ्यांकडून या आसनांचे प्रात्यक्षिक करून घेतले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

योग दिनानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. या फेरीद्वारे परिसरातील नागरिकांना योगाचे महत्त्व पटवून दिले आणि योगाबाबत जनजागृती केली. फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी योगाचे फायदे सांगणारे फलक हातात धरले होते आणि त्यांनी घोषणाही दिल्या.

या कार्यक्रमात क्रीडा शिक्षक नारायण वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना नियमितपणे योग करण्याचे आव्हान केले. त्यांनी योगामुळे होणारे शारीरिक आणि मानसिक फायदे विषद केले आणि विद्यार्थी जीवनात योगाचे महत्त्व स्पष्ट केले. पर्यवेक्षक श्री राठोड सरांनीही विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले आणि त्याचे पालन करण्याचा सल्ला दिला. शाळेचे मुख्याध्यापक श्री नाईकनवरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना योग दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांना नियमितपणे योग करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना योगाच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक फायद्यांबद्दल माहिती दिली आणि योगाचे पालन करण्याची विनंती केली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षकांनी खूप परिश्रम घेतले आणि हिरीरीने भाग घेतला. शिक्षकांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता वाढली आणि त्यांनी योगाचा नियमित सराव करण्याचा संकल्प केला. आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे हे साजरेकरण विद्यार्थ्यांच्या जीवनात एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. ***

बचत विजेची
समृद्धी राष्ट्राची !

# शक्तीपीठ महामार्गास तीव्र विरोध

## महामार्ग रद्दची अधिसूचना सरकारने काढावी; बाधित शेतकऱ्यांची मागणी

> शक्तिपीठ श्रद्धेचा भावनिक मुद्दा धरून मागणी नसताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन हजारो एक्कर सुपीक, बागायती जमीन संपादित करून शेतकऱ्यांना कायम स्वरूपी भूमिहीन करत भिकेला लावणारा हा शक्तिपिठ महामार्ग नसून कंत्राटदार हित महामार्ग आहे.विधान सभा निवडणुकीच्या तोंडावर केवळ शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी स्थगिती दिल्याची घोषणा सत्ताधारी करत आहेत.यापूर्वी देखील अतिरिक्त ऊस अनुदान, सोयाबीन, कापूस भावांतर याबद्दल देखील सत्ताधा-यांनी घोषणा केली मात्र शून्य अंमलबजावणी झाली.
>
> **- ॲड.अजय बुरांडे** (शेतकरी नेते, बीड)

परळी (बातमीदार):- पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्रुतगती शक्तिपीठ मार्गास राज्यात शेतकऱ्यांना कडाडून विरोध होत असून राज्य सरकार हा प्रस्तावित महामार्गास स्थगिती दिल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे.स्थगिती नकोय महामार्ग रद्द करण्यात आल्याची अधिसूचना काढण्यात यावी अन्यथा बाधित शेतकरी आपल्या कुटुंबासह हे आंदोलन अधिक तीव्र करतील असा इशारा परळी-अंबाजोगाई येथील बाधित शेतकऱ्यानी सरकारला दिला आहे.

नागपूरपासून गोव्यादरम्यान महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे जोडण्यासाठी, तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी मागणी नसताना देखील समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर आणखी लांब पल्ल्याचा शक्तीपीठ द्रुतगती मार्ग उभारण्याचा निर्णय फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आला होता.राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गाच्या उभारणीस तब्बल ८६ हजार कोटी खर्च येणार असून या महामार्गासाठी २७ हजार एक्कर पेक्षा अधिक शेतजमीन शासन संपादित करणार आहे.नागपूर-रत्नागिरी महामार्ग अस्तित्वात असताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे काम सरकार कडून होत असल्याचे लक्ष्यात येताच राज्यात या महामार्गास तीव्र विरोध होत आहे. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन शेतकरी कायमचे भूमिहीन होणार आहेत. या शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करण्याच्या अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली.याबाबत शेतकऱ्यांनी मराठवाडाभर संवाद यात्रा देखील काढली तर अनेक ठिकाणी तीव्र आंदोलन देखील झाली. सरकार कडून हा महामार्ग होणार नाही असे सांगण्यात येत आहे तर दुसऱ्या बाजूला जमीन संपादित करण्यासाठी आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली आहे ही बाब शेतकऱ्यांच्या लक्ष्यात आलेली असल्याने हे आंदोलन अधिक तीव्र बनले.शुक्रवार दि २१ रोजी बीड जिल्ह्यातील परळी-अंबाजोगाई येथील शेकडो बाधित शेतकऱ्यांची बैठक वरवटी व धायगुडा पिंपळा या ठिकाणी संपन्न झाली.या बैठकीत सरकारला शेतकऱ्यांच्या विरोधात जाऊन महामार्ग बनवायचा असेल तर भविष्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सरकारला देण्यात आला.या प्रसंगी अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष एड.अजय बुरांडे यांच्यासह माजी न्यायाधीश बी.आर तिडके, ॲड.एल.एन.शिंदे, वरवटी गावचे सरपंच सुधीर चाटे सह मोठ्या संख्येने शेतकरी आणि गावकरी उपस्थित होते. ***

# शरीर, मन व बुद्धीच्या विकासासाठी योग आवश्यक- डॉ.आचार्य

परळी वैजनाथ (बातमीदार):- सध्याच्या धावपळीच्या युगात मानवी जीवन दिवसेंदिवस हताश, निराश व दुःखी होत चालले असून त्यावर मौलिक उपाय म्हणजेच योगविद्या होय. शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी आणि सर्वांगीण शाश्वत सुखासाठी अष्टांग योगाचे अनुष्ठान करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन योगशिक्षक प्रा. डॉ. नयनकुमार आचार्य यांनी केले.

येथील वैद्यनाथ महाविद्यालयात एन.सी.सी., एन. एस. एस., क्रीडा व सांस्कृतिक विभागातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख योगप्रशिक्षक म्हणून डॉ.श्री आचार्य यांनी योगासने, प्राणायाम व ध्यानाचे प्रशिक्षण दिले. याप्रसंगी त्यांनी विविध आसने व प्राणायाम शिकवून दैनंदिन जीवनात आपल्या मानसिक व आध्यात्मिक विकासासाठी योग अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. स. ६.३० ते ७.३० यावेळेत संपन्न झालेल्या या योगदिन समारंभात सर्वप्रथम एनसीसी विभागाचे प्रमुख, कॅप्टन प्रा. श्री जी. एस. चव्हाण यांनी प्रास्ताविक करुन स्थूल व्यायामांचे प्रशिक्षण दिले. सध्याच्या युगात योगाचे महत्त्व ओळखून युवक व विद्यार्थ्यांमध्ये त्यांचा प्रसार व्हावा, यासाठी शाळा/ महाविद्यालयात योगदिन साजरा करण्याबाबत मा. कर्नल सुनील रेड्डी, कमांडिंग ऑफिसर ५१, महाराष्ट्र बटालियन, संभाजीनगर, यांनी काढले होते. त्यांच्या आदेशानुसार एनसीसी विभागाने योग प्रशिक्षणाच्या आयोजनाकरिता विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमानंतर प्र.प्राचार्य डॉ.आर.डी.राठोड, उपप्राचार्य प्रा.डॉ.व्ही.बी. गायकवाड , प्रा. हरीश मुंडे,विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. पी.एल. कराड, प्रा. डॉ. जे.व्ही. जगतकर यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी ,छात्र सेनेचे विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय छात्र सेना विभाग प्रमुख कॅप्टन जी.एस.चव्हाण आणि जि.प.शाळेचे एनसीसी सहशिक्षक श्री.शाकेर सर यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात व शेवट प्रार्थनेने झाली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना पौष्टिक फराळ वाटप करण्यात आले.*

संपादकीय...

# ही लूट थांबवा...

**–० सुविचार ०–**
ज्याप्रमाणे प्रत्येक मार्गावर अडचणी असतात, तसेच प्रत्येक अडचण सोडवण्यास एक मार्ग देखील असतोच.

समाजातील विविध घटकातील शालेय वयोगटातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून सरकार सतत व सर्वोतोपरी प्रयत्न करत असते. अन्न, वस्त्र, निवारा. या जशा माणसाच्या मुलभूत गरजा आहेत. त्याप्रमाणे शिक्षणही! आज जगण्यासाठी शिक्षणही तेवढेच महत्वाचे आहे. याचमुळे सरकारने शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे. शाळेत मुले यावीत ती शिकावीत म्हणून शासन वेगवेगळ्या उपक्रमाबरोबरच विविध योजना राबवत असते. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, शिक्षण अर्धवट अवस्थेत सोडून दिलेल्या शाळा बाह्य मुलांसाठीही सरकारचे प्रयत्न सतत सुरू असतात. परिस्थितीमुळे अनेक मुले शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून विविध शिष्यवृत्ती योजनाही शासन राबवते. शालेय वयोगटातील मुले शाळा सोडून कुठे काम करत असतील तर त्या विरुद्धही शासन ठोस भूमिका घेते. यासाठी असलेला बालमजुरीचा कायदाही कडक आहे. एकूणच प्रत्येक मुल शाळेत गेले पाहिजे ते शिकले पाहिजे, शाळेत टिकले पाहिजे म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न होतात.

आपल्याकडे शासनाच्या जिल्हा परिषद त्याच बरोबर खासगी शिक्षण संस्थेच्या शाळा महाविद्यालये आहेत. संस्थांना शासन अनुदान देते. शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, अनेक मुलींना सायकल, एसटीबसचा मोफत पास अशा कितीतरी योजना राबवत आहे. यावर करोडो रुपये खर्च केले जातात. उद्याचा देश घडवण्याची जबाबदारी आज ज्या शाळकरी मुलांवर आहे. ती मुले सुजान नागरिक झाली पाहिजे म्हणून धडपडत सुरू असते.

वाढत्या लोकसंख्येमुळे आपल्याकडे सर्वच क्षेत्रात आज जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. कोण किती शिकले या पेक्षा कुणाला काय येते याला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. शाळा, महाविद्यालये, शिकवण्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करत असतात. ज्या शाळेचा निकाल चांगला आहे. जिथे विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली घडवली जाते. अशा चांगल्या व नावाजलेल्या शाळेत आपली मुले शिकावीत म्हणून पालकांची धडपड सुरू असते. समाजसेवेचा वसा म्हणून आपल्याकडे खासगी संस्थांची शाळा, महाविद्यालये सुरू झाली. ज्यांनी ती सुरु केली त्यांचा उद्देशही उदात्त व मोठा होता. परंतु आज बदलत जाणाऱ्या परिस्थितीत अनेकांनी शिक्षणाचा बाजार मांडून चांगला धंदा सुरू केला आहे. यात अनेक गैरप्रकार होत आहेत. गोर-गरीब, गरजू, गुणवंत मुलांवर अन्याय होत आहे. 'ज्यांच्याजवळ पैसा त्यांचे शिक्षण' असे होऊन बसले आहे. लाखो रुपये शासनाचे अनुदान लाटूनही प्रवेशासाठी विद्यार्थी पालकांची सर्रास लूट अनेक विद्या मंदीरात सुरू आहे. अनेक इंग्रजी शाळांनी तर विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या बाबतीत मनमानी चालवली आहे. याकडे कुणाचेही लक्ष नाही. शासनाचे अनुदान घेऊनही विद्यार्थी पालकांकडून विविध मार्गाने पैसा काढणाऱ्या शाळा-महाविद्यालयावर कारवाई का होत नाही हा प्रश्न आज सर्वसामान्यांना पडला आहे. शासनाने शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. तसा कायदा केला आहे. असे असूनही कायद्याचे उल्लंघन करून कायदा पायदळी तुडवला जात आहे. 'काहीही करा आपले काहीच होत नाही!' ही प्रवृत्ती समाजात दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे समाज व्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. शिक्षण क्षेत्रातच नाही तर समाजातील विविध क्षेत्रात असेच सुरू आहे. यामुळे समाजाची लूट सुरू असून अनेक नागरिक या प्रकारात भरडले जात आहेत. यासाठी आता समाजातील जाणकारांनी पुढे येऊन संघर्ष केला पाहिजे. शासनानेही ठोस भूमिका घ्यायला पाहिजे अशी लोकभावना आहे. ***

# छ.शाहू महाराजांनी वंचितांसाठी उघडले शिक्षणाचे महाद्वार...

राजर्षी शाहू महाराज (१८७६-१९२२) हे भारतीय रियासत कोल्हापूरचे राजे होते. ते त्यांच्या काळातील थोर समाजसुधारक म्हणून ओळखले जात. शाहू महाराज हे कोल्हापूरच्या इतिहासातील अमूल्य रत्न होते. व्यवसाय, प्रशासन, दलित मुक्ती, स्त्री शिक्षण अशा विविध क्षेत्रांत समाजाच्या कल्याणासाठी योगदान देणारा सर्व पुरोगामी उपक्रम सक्तीने राबविणारा उदार अंतःकरणाचा राजा म्हणून जनमानसात त्यांचा दरारा होता.

राजर्षी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांसाठी शिक्षणाचा प्रसार ही मुख्य समस्या समजून याकडे जातीने लक्ष्य दिले होते. ज्ञान हे शक्ती आणि समृद्धीचे स्त्रोत आहे, हे त्यांच्या लक्षात आले होते. या बाबतीतले त्यांचे आकलन अत्यंत दूरदृष्टीचे होते. त्यांना वाटत होते की, सामान्यजनात शिक्षण नसल्याने मागासलेपण अमाप आहे. ते नाहीसे करण्यासाठी शिक्षणाची कवाडे शिक्षणवंचितांसाठी सताड उघडी करणे, शिक्षण म्हणजे काय हे माहित नसलेल्या समाजामध्ये शिक्षणामध्ये आस्था निर्माण करणे व शिक्षणासंबंधी गोडी निर्माण करून शिक्षण हीच समग्र परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे याचे भान समाजात रुजविण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

महात्मा फुलेंनी स्थापन केलेली सत्य-शोधक समाज ही महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मागासलेल्या आणि वंचित समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करणारी पहिली संस्था होती. खेड्यापाड्यात पोहोचणारा हा आधुनिक भारतातील पहिला सामाजिक विचार होता. महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये ते काम सुरू केले, १८७० च्या शिक्षण कायद्यानुसार इंग्रज सरकारने शाळा सुरु केल्या आणि १८८० मध्ये दहा वर्षांपर्यंतचे प्राथमिक शिक्षण अनिवार्य केले. या प्रगतीशील बदलामुळे प्रेरित होऊन, महात्मा फुले यांनी १८७९ च्या शेवटी आणि १८८० च्या सुरुवातीस खेडेगावात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचे आवाहन ब्रिटिश सरकारला केले. कारण त्यांनी जाणले होते, सामाजिक समता ही शक्ती हळूहळू परंतु निश्चितपणे शिक्षणाच्या माध्यमातून उदयास येईल. या नंतर पुण्यातील ब्राह्मणांनी उच्च वर्गासाठी शिक्षण सुरू केले, तर महात्मा फुले आणि शाहू महाराजांनी मागासवर्गीयांसाठी शिक्षण सुरू केले. कोल्हापूर राज्यात १८४४ च्या सुमारास सुमारे १२२ खाजगी ग्रामीण शाळा होत्या. कोल्हापूर सरकारने १८४८ मध्ये कोल्हापूर, पन्हाळा, आळते, शिरोळ येथे सरकारी शाळा सुरू केल्या आणि १८४९ मध्ये कागल, बावडा, गडहिंग्लज, मलकापूर आणि भुदरगड येथे तर १८५१ आणि १८५४ मध्ये इतर अनेक ठिकाणी अधिक शाळा उघडल्या गेल्या. १८६७ मध्ये पुरुषांसाठी प्रशिक्षण महाविद्यालय सुरू करण्यात आले आणि १८८२ मध्ये महिलांसाठी एक प्रशिक्षण महाविद्यालय सुरू करण्यात आले. कोल्हापूर हायस्कूल ज्याला नंतर राजाराम छत्रपतींचे नाव देण्यात आले ते १८६७ मध्ये सुरू करण्यात आले. शाहू महाराजांच्या राज्यारोहणाच्या वेळी ब्राह्मणांमध्ये शिक्षितांची टक्केवारी ७९.१, मराठा ८.६, कुणबी १.५, मुस्लिम ७.५ आणि जैन आणि लिंगायत १०.६ होती. शाहू महाराजांनी जनतेच्या नैतिक आणि भौतिक सुधारणेसाठी ठोस उपाययोजना करण्याचा संकल्प केला. नैतिक आणि भौतिक प्रगती म्हणजे शिक्षण, स्वच्छता आणि कृषी विकास. त्यांना स्थानिक कारभारात मागासवर्गीयांचा मोठा वाटा आणि सार्वजनिक संस्थांमध्ये प्रतिनिधित्व द्यायचे होते. साहजिकच, मागासवर्गीयांनी आपल्या हक्कांसाठी जागृत व्हावे अशी त्यांची इच्छा होती आणि त्यांना विश्वास होता की त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार करून तो ते साध्य करू शकतात. म्हणून शाहू महाराजांनी मागासवर्गीयांच्या मार्गातील अडचणी दूर करण्यास



सुरुवात केली, त्यांनी वसतिगृहे आणि इतर सुविधा, विशेषतः खेड्यातील विद्यार्थ्यांसाठी सुरु केल्या. सुरुवातीला त्यांनी काही विद्यार्थ्यांना आपल्या वाड्यात ठेवले होते, त्यांना राहण्याची सोय करून त्यांची फी भरली होती. मुलं मात्र भरपूर अन्न आणि उत्तम सुविधांमुळे आळशी आणि सुस्त झाली. त्यांची प्रगती असमाधानकारक असल्याने शाहू महाराज निराश झाले. याच सुमारास कोल्हापुरात महाविद्यालयाशी संलग्न असलेले एक वसतिगृह होते, ज्याला राज्याचे अनुदान होते, परंतु ते ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी खुले होते, सुरुवातीला ते कोणत्याही जाती-धर्माचा विचार न करता सर्वांसाठी खुले असेल असे जाहीर करण्यात आले होते. या मदतीबद्दल प्राध्यापक विजापूरकर यांनी शाहू महाराजांचे कौतुक केले आणि शिक्षणासाठी काम करणाऱ्यांना मदतीसाठी शाहू महाराज सदैव तत्पर असल्याचे सांगितले. दुष्काळाच्या काळात, पोरांना वाढत्या खर्चापासून मुक्त करण्याच्या हेतूने शाहू महाराजांनी त्यांचा मासिक खर्च रु. ५ वर आणला. आणि वसतिगृहाचे अध्यक्ष व्ही, बी गोखले, सहायक न्यायाधीश यांची नियुक्ती केली.

ही संस्था फार काळ टिकली नाही, तिच्या कठोर निर्बंधांमुळे नव्हे, तर शाहू महाराजांनी एप्रिल १९११ मध्ये ती बंद केली कारण त्यांना आढळून आले की जवळपास दहा वर्षे ब्राह्मणेतर विद्यार्थी इकडे फिरकलेच नाहीत. तेव्हाच १८९९ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पी सी पाटील यांनी पन्हाळा येथे छत्रपतीं शाहूंची भेट घेतली. ते शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या पहिल्या बोर्डिंगचे पहिले विध्यार्थी होते. त्यांना १९११ साली सरकारने उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस पाठविले होते. ते पुढे सुप्रसिद्ध शेतीतज्द्न्य व पुण्याच्या शेतकी महाविद्यालयाचे प्राचार्य ही होते. वर्णवर्चस्ववादी ब्राह्मणांकडून ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना भोगावे लागलेले अपमान आणि कटू अनुभव त्यांनी शाहू महाराजांना सांगितले. मराठ्यांच्या बोर्डिंगच्या प्रकल्पाची योजना सुरू करण्यापूर्वी, महाराजांनी न्यायमूर्ती रानडे आणि जी. के. गोखले यांचा सल्ला घेतला, ज्यांनी या विषयावरील त्यांच्या कल्पनांचे कौतुक केले. महाराज डेक्कन एज्युकेशनचे अध्यक्ष होते. या व्यापक विचारसरणीचे उदारमतवादी, समाजातील दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठी फारसे काही करू शकले नसले तरी, शाहू महाराजांनी आखलेल्या योजनेला पाठिंबा दिला कारण त्याचा संपूर्ण समाजाला फायदा झाला. शाहू महाराजांनी सार्वजनिक सूचना संचालक ई. गाईल्स यांचाही सल्ला घेतला, ज्यांनी मराठा विध्यार्थ्यांसाठी सुरु केलेल्या बोर्डिंगच्या प्रकल्पाचे कौतुक केले आणि १० ऑगस्ट १९०० रोजी शाहू महाराजांच्या पत्राला उत्तर दिले; महाराजांचे पत्र मिळाल्यामुळे मला खूप आनंद झाला आहे आणि मराठ्यांसाठी बोर्डिंग स्कूलच्या प्रकल्पाबद्दल तुमच्याशी बोलताना मला आनंद होईल. मराठ्यांना शैक्षणिकदृष्ट्या पुढे आणण्यासाठी काही विशेष प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, हे मी पूर्णपणे मान्य करतो. त्यांच्या सवयी आणि भावना उच्च शिक्षणाच्या दिशेने नाहीत आणि परिणामी ते ब्राह्मण समाजाच्या तुलनेत मागे पडले आहेत. मला आठवते, मी कोल्हापूर कॉलेजला भेट दिली तेव्हा मला असे दिसले की, मराठे कोर्सला चिकटून राहिले नाहीत. परिणामी, मला त्यांच्याकडून क्वचितच शैक्षणिक विभाग आणि इतर विभागांमध्ये नोकरीसाठी अर्ज येतात. (संदर्भ: शाहू छत्रपती, ए रॉयल रेव्होल्यूशनरी, लेखक: डी व्ही कीर, पृष्ठ क्र.१०१)अशा प्रकारे रानडे, गोखले, शिक्षण संचालक आणि गंगारामभाऊ म्हस्के यांच्याशी चर्चा करून आणि तीन 'पदवीधरांना- भास्करराव जाधव, दाजीसाहेब विचारे आणि जिवाजीराव सावंत यांना योग्य मार्गदर्शन करून शाहू महाराजांनी त्यांना मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढण्याची प्रेरणा दिली. त्याला व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस असे म्हणतात. हे १८ एप्रिल १९०१ रोजी पॉलिटिकल एजंटच्या अध्यक्षतेखाली खुले घोषित करण्यात आले. राणी व्हिक्टोरियाने शाहूंना महाराजा ही कायमस्वरूपी पदवी बहाल केली होती. त्यांच्या राजवटीतच भारतातील ब्राह्मणेतरांसाठी ज्ञानाची दारे खुली झाली. त्यामुळे राणीचे नाव संस्थेला देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीत शंकरराव इंदुलकर, बाळासाहेब खानविलकर, नानासाहेब गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, हिंदुराव घाटगे आणि आळवेकर यांसारख्या दिग्गजांचा समावेश होता, सातारा येथील पी.के. शिंदे यांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. हे वसतिगृह असलेला बंगला वनविभागाचा होता. बोर्डिंगचे सचिव म्हैसाळकर होते. वसतिगृह कायमस्वरूपी ठेवण्यासाठी शाहू महाराजांनी जमीन दान केली, त्याला भरीव देणगी दिली आणि वार्षिक ५५० रुपयांचे अनुदान मंजूर केले आणि वर्षाकाठी रु. २,०००च्या स्थायी उत्पन्नाची सोय केली. वसतिगृहातील विध्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही देण्यात आली.वसतिगृहाच्या स्थापनेतील यशाबद्दल तिन्ही

(उर्वरित पान ३ वर)

'**परळी परिसर**' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# वसतीगृह प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन

बीड, (जि.मा.का.):- बीड जिल्ह्यातील बाहेरील पात्र विजाभज इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी नंतर उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विजाभत व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासनातर्फे मुला मुलींची वस्तीगृह सुरू करण्यात आलेली असून सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाचे वेळापत्रक हे सर्व शासकीय वस्तीगृह सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड येथे सूचनाफलकावर लावलेले आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृह प्रवेश अर्ज इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय बीड येथे विनामूल्य उपलब्ध असून दिनांक २२ जून २०२४ ते २५ जुलै २०२४ या कालावधीत भरून द्यावयाचे आहेत. अर्ज करत असताना संबंधित विद्यार्थ्यांनी वस्तीगृह प्रवेश अर्जासोबत महाविद्यालयाचे बोनाफाईड, आधार कार्ड, बँक पासबुक, मागील वर्षाचे गुणपत्रक, मार्कशीट, टी.सी., शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, दोन फोटो, रहिवासी दाखला इत्यादी आवश्यक कागदपत्रे यांची छायांकित प्रतीसह प्रवेश अर्ज दिनांक २५ जुलै २०२४ पर्यंत सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांच्या कार्यालयात सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

दिनांक २५ जुलै २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही. माहितीसाठी सर्व शासकीय वस्तीगृह, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयात संपर्क साधावा. सदर वस्तीगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी शासकीय वस्तीगृहामध्ये खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

मुलांचे शासकीय वसतिगृह, फरताडे कॉम्प्लेक्स, पालवण रोड बीड. गोविंद शरद लोळगे, मोबाईल क्रमांक ९६०४६६७६१५, मुलींचे शासकीय वस्तीगृह, लाटे कॉम्प्लेक्स, गोविंद नगर, धानोरा रोड बीड भाग्यश्री कचरू डोंबाळे मोबाईल क्रमांक ७० २० १२ २०१८ यावर संपर्क साधवा. ***

(पान २ वरुन)....

## ..शिक्षणाचे महाद्वार

पदवीधरांचे अभिनंदन करून 'समर्थ' साप्ताहिकाने लिहिले होते की, हे काम ब्राह्मण पदवीधर करू शकत नाहीत. साप्ताहिकाने संस्थेबद्दल वायफळ बोलणाऱ्या ब्राह्मणांना फटकारले. बोर्डिंगचे नाव मराठा असले, तरी मुस्लिम, कोळी, माळी, गवळी अशा इतर जाती-जमातींतील विद्यार्थ्यांना यामध्ये प्रवेश दिला होता व त्यांना भोजनाचीही व्यवस्था केली होती. भारतातील जातीभेदासारख्या एका जुन्या सामाजिक समस्येकडे पाहण्याचा हा खरोखरच एक नवीन, धाडसी आणि उदारमतवादी दृष्टिकोन होता. हा उपक्रम सुरू करण्यामागे शाहू महाराजांची दोन उद्दिष्टे होती. एक म्हणजे जातीय भेद नष्ट करणे आणि दुसरे म्हणजे अशा वसतिगृहे आणि बोर्डिंग स्कूल्सच्या स्थापनेत त्यांच्या समुदायांमध्ये पुढाकार घेणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे. त्यांनी समाजाच्या नेत्यांना एकत्र बोलावले, त्यांच्यातील मतभेद दूर केले आणि त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले, त्यांच्या जातींमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांचे सहकार्य मागितले. या कृतीतून ब्राह्मणेतर लोकांमध्ये संघटना आणि शिक्षणाचा प्रसार होण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती. काही कालावधीनंतर कर्नल सीली यांनी २५ सप्टेंबर १९०१ रोजी या संस्थेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन करताना मराठा विद्यार्थ्यांना केवळ अल्पदरात बोर्डिंग व लॉजिंग उपलब्ध करून न देता त्यांच्या नैतिक कल्याणाचीही तरतूद करावी, असे आवाहन समितीला केले. त्यांना असे वाटत होते की, नैतिक प्रशिक्षणाने परिपूर्ण नसलेले केवळ बुद्धीचे प्रशिक्षण राज्यासाठी चांगले नाही. कोल्हापूर राज्यात केवळ मराठ्यांचा समावेश नाहीं हें विसरूं नये. मराठा समाजाचे हित पुढे नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असताना, हे विसरू नका की, राज्यात इतर सदस्यही असतात. आपल्या ध्येयांचा पाठपुरावा करताना, सामान्य हितासाठी, समान कल्याणासाठी आपले प्रयत्न उल्लेखनीय असतात ही चांगली गोष्ट आहे. (संदर्भ: मेमॉयर्स ऑफ हिज हायनेस, श्री शाहू छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर, लेखक ए. बी. लट्ठे, पृष्ठ क्र.१३९ आणि १४०) यावेळी महाराजांनी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊसच्या कायमस्वरूपी निधीसाठी रु.४,००० दिले, रु.५जज चे वार्षिक योगदान देण्याचे वचन दिले आणि रु.८०० किमतीची मालमत्ता संस्थांना विस्तारासाठी दान केली. महाराजांच्या या कामगिरीवर, टिळकांच्या 'मराठा' या वृत्तपत्राने शाहू महाराजांवर गंभीरपणे टीका केली आणि म्हटले: राज्याचा शासक विशेषतः जातीय किंवा सांप्रदायिक पूर्वग्रहांच्या वरचा असावा. टिळकांनी महाराजांवर टीका करण्याची एकही संधी सोडली नव्हती, हे विशेष! निपाणी येथील जैन परिषदेनेही शाहू महाराजांच्या सूचनेवरून विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि नंतर मदतीसाठी महाराजांकडे संपर्क साधला. सर्व जातींच्यासाठी एक बोर्डिंग काढण्याचा १८९६ साली केलेला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर शाहू महाराजांनी प्रत्येक जातीसाठी वेगळ्या बोर्डिंग काढण्यास १९०१ सालापासून सुरुवात केली. विविध जातींसाठी महाराजांनी २० बोर्डिंग काढून यशस्वीपणे त्या चालवल्या होत्या. या बोर्डिंगमधून शिक्षण घेतलेले विध्यार्थी पुढे राज्यातच नव्हे तर देशात आपला ठसा उमटविण्यात यशस्वी ठरले होते. एक खंत कायम वाटत राहते, ती ही की, शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर जातीतील सर्वच घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, नव्हे त्यासाठी त्यांनी व्यक्तीगतरित्या खूप परिश्रम घेतले, ब्राह्मणेतरांना रोजगार देण्यासाठी अनेक सुधारणा केल्या; परंतु या जातीतील लोकांनी नंतर अगदी मराठ्यांनीसुद्धा शाहू महाराजांप्रती निष्ठा जोपासल्याचे आढळून येत नाही. मराठ्यांच्या व इतर ब्राह्मणेतरांच्या किती घरामध्ये शाहू महाराजांचा फोटो आदराने लावलेला असेल, हे सांगणे कठीण आहे!

**– भीमराव सरवदे, औरंगाबाद**

